**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची लाईफलाईन करणार समुपदेशन**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील कॉन्सिलिंग आणि सायकोथेरपी विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी कोव्हिड-१९ मध्ये संक्रमित रुग्णांचे मनोबल व आत्मियता वाढविण्यासाठी समुपदेशन करणार आहेत. या संदर्भात या विभागाद्वारे समुपदेशनसाठी लाईफलाईन सुरु करण्यात आली आहे. अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री शैलेश नवाल यांनी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांना पत्र पाठवून आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे लाईफलाईन नावाची हेल्पलाईन सुरु करुन त्याद्वारे तज्ज्ञ समुपदेशकांचे मार्गदर्शन व सल्ला कोव्हिड संक्रमित रुग्णांना द्यावा, त्यामुळे त्यांचेवरील ताणतणाव कमी होण्यास मोलाची मदत होणार असून सहकार्य करण्याची विनंती केली आहे.

प्रज्ञा मुनेश्वर, राणी शेख, प्रा. मंजुषा बारबुद्धे, सायली देशपांडे, पूर्णिमा भोयर, विना तांबी, प्रा. मनिषा लाकडे, प्रा. सविता सोनवणे, निलेश सोळंके, प्रा. पुजा काळे, प्रा. उज्वला गोडबले, प्रिया गुल्हाने, सुधिर भारती, सुवर्णा माने, प्रा.डॉ. गजानन गोसावी, प्रा. मनिष भडांगे, प्रा. वनिता राऊत आदी कॉन्सिलर संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोव्हिड संक्रमित रुग्णांना संपर्क साधून त्यांचे समुपदेशन करणार आहेत. विद्यापीठाच्या स्तुत्य उपक्रमासाठी विद्यापीठाचे सार्वत्रिक कौतुक होत असून या उपक्रमाद्वारे कोव्हिड संक्रमित रुग्णांना निश्चितपणे आधार मिळणार आहे. तरी याकरीता सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०७/२०२०.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी